Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 02/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाताव्या, आतल्या वाताव्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## स्वतंत्र प्रज्ञेचे कृतिशील साहित्यिक श्री.म.माटे



श्रीपाद महादेव माटे हे बहुविध स्वरूपाचे ललित आणि वैचारिक लेखन करणारे, स्वतंत्र प्रज्ञेचे साहित्यिक, नामवंत प्राध्यापक, अस्पृश्यता निवारणाचे कार्य करणारे कृतिशील, निष्ठावंत समाजसेवक होते. त्यांचा जन्म विदर्भातील शिरपूर या गावी २ सप्टेंबर १८८६ रोजी झाला. त्यांचे शिक्षण सातारा व पुणे येथे एमएपर्यंत झाले. त्यांच्या विद्यार्थिजीवनात रँग्लर परांजपे, वासुदेवराव पटवर्धन, गो. चिं. भाटे, पां. दा. गुणे, सीतारामपंत देवधर यासारख्या थोर अध्यापकांचे विशेष मार्गदर्शन त्यांना लाभले. लोकमान्य टिळक, थोर संस्कृत पंडित वासुदेव शास्त्री अभ्यंकर यांच्या कार्याचाही प्रभाव माटे यांच्यावर पडला. सातारा (न्यू इंग्लिश स्कूल) आणि पुणे (न्यू इंग्लिश स्कूल नूतन मराठी विद्यालय) येथील शाळांतून अध्ययन केल्यानंतर १९३५-४६ या कालखंडात पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयात ते इंग्रजीचे व मराठीचे प्राध्यापक होते.

शास्त्रीय ज्ञानाचे आणि विज्ञानप्रसाराचे महत्त्व जाणून त्यांनी विज्ञानबोधचे संपादन केले. अस्पृश्यांचा प्रश्न (१९३३) हा आपला मूलगामी ग्रंथ लिहिण्यापूर्वी अस्पृश्यतानिवारणाचे कार्य त्यांनी अनेक वर्षे तळमळीने केले होते. माटे यांचा पिंड चिंतनशील समाजशास्त्रज्ञाचा असल्यामुळे त्यांचे महत्त्वाचे वैचारिक लेखन या चिंतनशीलतेतून झाले आहे. उपेक्षितांचे अंतरंग (१९४१), अनामिका (१९४६), माणुसकीचा गहिवर (१९४९), भावनांचे पाझर (१९५४) यासारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. महारमांग, रामोशी, कातवडी इ. उपेक्षित जमातींतील व्यक्तींचे, त्यांच्या सुखदुःखांचे त्यांच्या जीवनरीतींचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण त्यांनी त्यात सहृदयतेने केले आहे. 'कृष्णाकाठचा रामवंशी', 'तारळखोऱ्यातील पिऱ्या', 'नाथनाक आणि देवका यांची काळझोप' आणि 'सावित्री मुक्यानेच मेली' यासारख्या त्यांच्या कथा आजही अविस्मरणीय वाटतात. आपल्या प्रज्ञेस सतत प्रज्वलित व स्वतंत्र ठेवून मराठी वाङ्मयावर एक चिरंतन मुद्रा उमटविणाऱ्या या थोर ज्ञानोपासकाचे पुणे येथे २५ डिसेंबर १९५७ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 02, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401